# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ४५ वा ❑ गुरूवार दि.२० मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## पारंपरिक लावणीची पताका फडकवत ठेवा-डॉ. शेषराव पठाडे

### बैठकीची व पारंपारिक लावणी विषयी सप्रयोग व्याख्यान रंगले

**ज्योतिर्मय 🕮 साहित्य**

**अहिल्यानगर** – महाराष्ट्राची शान आणि लोक कलेचा अभिमान असणाऱ्या पारंपारिक लावणीची पताका नव्या पिढीतील तरुणींनी फडकत ठेवावी, असे आवाहन लावणी अभ्यासक प्रा. डॉ. शाहीर शेषराव पठाडे यांनी मंगळवारी १८ रोजी येथे केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित १० दिवसीय निवासी लावणी नृत्य प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते.

या शिबिराच्या संचालिका लावणीसम्राज्ञी राजश्रीताई काळे नगरकर, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ ढोलकी वादक पांडुरंग घोटकर, ज्येष्ठ हार्मोनियम वादक भालेराव व शिबिर समन्वयक भगवान राऊत आदी यावेळी उपस्थित होते.

शिबिरार्थींना पारंपारिक लावणीबद्दल मार्गदर्शन करताना शाहीर शेषराव पठाडे म्हणाले की, लावणीचे मूळ, संत-पंत काव्यात आहे.



पेशवाईच्या काळात लावणी बहरली. शाहीर पठ्ठे बापूराव, शाहीर होनाजी बाळा, सगन भाऊ यांच्याबरोबरच पंढरपूरच्या ज्ञानोबा उत्पात यांनीही अनेक लावण्या लिहिल्या आणि या लावण्यातून मनोरंजना बरोबर समाज प्रबोधन ही केले.

रोशन सातारकर, यमुनाबाई वाईकर, सुलोचना चव्हाण, सत्यभामा पंढरपूरकर, लक्ष्मीबाई कोल्हापूरकर, लीला गांधी, मधू कांबीकर, राजश्री काळे नगरकर, आरती काळे नगरकर अशा अनेक लावणी सम्राज्ञींनी महाराष्ट्राला लावणीचे वैभव प्राप्त करून दिले. त्या पारंपारिक लावणीचे जतन आणि संवर्धन करणे तुमच्या हातात आहे. या शिबिराच्या माध्यमातून आगामी काळात अनेक लावणी कलावंत घडतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉक्टर शेषराव पठाडे यांनी लावणीसम्राट गुरु ज्ञानोबा उत्पात यांच्या, वाटलं होतं तुम्ही याल, नुसतं हसून राया चालायचं नाही, चला जेजुरीला जाऊ या पारंपरिक लावण्या ठसक्यात सादर करून शिबिरार्थींची मने जिंकली. शाहीर पठ्ठे बापूरावांच्या आधी गणाला रणी आणा हो आणि नमुया आधी देश भारती, मानवतेची करुनी आरती या गणाने त्यांनी आपल्या सप्रयोग व्याख्यानास प्रारंभ करून लावणीचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळाबाबत मार्गदर्शन केले. ज्येष्ठ ढोलकी वादक पांडुरंग घोटकर गुरुजी यांच्या हस्ते प्रा. डॉ. शेषराव पठाडे यांचा शाल व ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. शेषराव पठाडे यांनी आपली ग्रंथसंपदा ढोलकी वादक पांडुरंग घोटकर गुरुजी व लावणीसम्राज्ञी राजश्री काळे नगरकर यांना भेट दिली.

भगवान राऊत यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. लावणी सम्राज्ञी राजश्री काळे नगरकर यांनी आभार मानले. यावेळी लावणी नृत्य प्रशिक्षण शिबिरार्थी, विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले.

---

## विशेष लेख...

### जेष्ठ इतिहासतज्ञ हरपले

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल



**ज्योतिर्मय 🕮 साहित्य**

प्रा. मा.म. देशमुख हे महाराष्ट्राच्या पुरोगामी इतिहासातील व चळवळीत गाजलेले एक नाव म्हणजे मा. म.देशमुख. आज ते काळाच्या पडद्याआड गेले..हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे दुःखद निधन झाले.. ते नागपूरच्या धनवटे नॅशनल कॉलेजमधून इतिहास विषयाचे विभाग प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाले होते.. मा.म. देशमुख हे एक महान तत्त्वज्ञ, इतिहास संशोधक होते. विविध पुस्तके व व्याखाने देऊन त्यांनी लोकजागृती केली. विपुल ग्रंथ लेखन करून खरा इतिहास समाजा समोर त्यांनी आणले. त्यांनी लिहिलेल्या अनेक ग्रंथांपैकी मध्ययुगीन भारताचा इतिहास वादग्रस्त ठरला.. सरकारने या पुस्तकार बंदी घातली होती. पण मा म देशमुखांनी हायकोर्टाकडून बंदी उठवली. सरकार व विरोधकांच्या दबावाला बळी न पडता त्यांनी खरा इतिहास समोर आणला.

स्पष्टवक्तेपणा वापरून इतिहास संशोधन समोर आणण्याचे काम केले त्यांनी केले. समाज परिवर्तन, राष्ट्रजागृती व खरा इतिहास समाजासमोर आणण्याचे धाडस त्यांनी केले.. या बाबतीत त्यांना विरोधकांचा अतोनात त्रास झाला.पण सत्याची कास त्यांनी कधीच सोडली नाही.

आपल्या राष्ट्रजागृती लेखमालेतून त्यांनी समाजात परिवर्तन घडवून आणले परीवर्तनवादी लेखक, वक्ते म्हणून त्यांची ख्याती राहिली. खालील ग्रंथ लेखन करून त्यांनी खरा इतिहास समोर आणला.

रामदास आणि पेशवाई, मराठा-कुणबी समाजाची दशा आणि दिशा, बहुजन समाज आणि परीवर्तन,

शिवराज्य, मनुवाद्यांशीलढा, राष्ट्रनिर्माते, शिवशाही, मध्ययुगीन भारताचा इतिहास, मराठ्यांचे दासीपुत्रः संपादित भांडारकर तो झाँकी है शनिवारवाडा अभी बाकी है, जिजाऊ,

**अभ्यास कसा करावा ?**

या व अशा अनेक विचारग्रंथांतुन तसेच आपली व्याख्याने, लेख, चर्चासत्र, प्रशिक्षण शिबीरांमधुन मनुवादी लेखकांनी लिहीलेला खोटा इतिहास पुराव्यासहीत खोडून काढण्याबरोबरच वैचारिक धन वाटण्याचे कार्य त्यांनी केले.


महाराष्ट्र जेव्हा शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला जात होता तेव्हा हा पुतळा उभारण्या मागचा उद्देश मामा देशमुख यांनी स्पष्ट केला केवळ मुस्लिम द्वेष हा पुतळा उभारण्या मागचा होता. असा घणाघात त्यांनी केला.

या देशातील बहुजन समाज आंधळा आहे आणि याचा नेमका फायदा या देशातील मनुवादी लोक घेतात त्यामुळे बहुजन समाजाने मनुवाद्यापासून दूर राहिला पाहिजे असा सल्ला त्यांनी आपल्या वेगवेगळ्या ग्रंथांमधून दिलेला आहे.

मनुवादी लेखकांनी लपवलेला आणि इतिहासात शिवरायांवर तलवारीने वार करणारा अफजलखानाचा वकील देशमुखांनी सर्वप्रथम आपल्या लेखणीतुन समाजासमोर आणला.

एके काळी विरोधकांनी सरांच्या लेखनाची इतकी धास्ती घेतली होती की सरांचे मुद्दे खोडता येत नाहीत म्हणुन त्यांची प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढण्याचाच प्रयत्न त्यांनी केला.पण सरांच्या अंगात सुध्दा मराठ्याचं रक्त आहे ही गोष्ट विरोधक जाणून असल्यामुळे ते सरांना काहीच करु शकले नाहीत.अशा या परिवर्तनवादी लेखक विचारवंत व इतिहास तज्ञाचे कालवश होणे ही फार मोठी पोकळी निर्माण करणारी आहे. सरांना भावपूर्ण अभिवादन

---



## रेखा बैजल यांना हिंदी साहित्य अकादमी पुरस्कार

**ज्योतिर्मय 🕮 साहित्य**

**मुंबई** – मराठी व हिंदी भाषेत लेखन करणा-या रेखा बैजल यांच्या '' अज्ञेय '' या हिंदी कादंबरीस महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी चा जैनेंद्र जैन पुरस्कार प्रदान करण्यात आला.अकादमी च्या उपाध्यक्ष श्रीमती मंजू लोढा यांच्या हस्ते ५०,०००/- चा धनादेश,शाल, सन्मान पत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.हा कार्यक्रम मुंबई येथील रंगशारदा भवन येथे १८ मार्च ला संपन्न झाला.

यापूर्वी २७ फेब्रुवारी ला मुंबई येथील गेटवे ऑफ इंडियाच्या प्रांगणात उभारलेल्या भव्य सभा मंडपामध्ये रेखा बैजल यांच्या '' तुमचा आमचा संजू '' या बालकादंबरीस महाराष्ट्र शासनाचा साने गुरुजी राज्य पुरस्कार प्रदान केला गेला.महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे व भूतपूर्व संमेलनाध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे यांच्या हस्ते ५०,०००/- चा धनादेश, शाल व स्मृतिचिन्ह देऊन रेखा बैजल यांना गौरविण्यात आले.महाराष्ट राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री ना.अजीतदादा पवार हे या प्रसंगी उपस्थित होते.

---

## नाशिकची रंगपंचमी

**ज्योतिर्मय 🕮 साहित्य**

नाशिकची रंगपंचमी ही महाराष्ट्रातील सर्वांत प्रसिद्ध आणि अनोख्या रंगोत्सवांपैकी एक आहे. दरवर्षी होळीच्या पाचव्या दिवशी नाशिकमध्ये रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या दिवशी शहरातील रामकुंड परिसर, गंगा घाट आणि मुख्य बाजारपेठा विविध रंगांनी न्हालेल्या दिसतात.

नाशिकची रंगपंचमी खास करून ढोल-ताशांच्या गजरात, गुलालाच्या वर्षावात आणि रंगांच्या उधळणीत साजरी केली जाते. शहरातील तरुण, वृद्ध आणि पर्यटक मोठ्या संख्येने यात सहभागी होतात. काही ठिकाणी विशेष मिरवणुका काढल्या जातात, ज्या पारंपरिक संगीत आणि नृत्यासह असतात.



ही रंगपंचमी नाशिककरांसाठी केवळ एक सण नसून, पारंपरिक आणि सांस्कृतिक वारसा जोपासणारा सोहळा आहे. त्यामुळे हा सण पाहण्यासाठी राज्यभरातून आणि देशभरातून पर्यटक नाशिकला येतात.

---

### लक्षवेधी छायाचित्र....



माझा नाद करायचा नाय.....

(स्थळ-आफ्रिकेतील जंगल, छाया-संजय दारमवार, मुंबई)







– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## व्यक्तीचे व्यक्त होणे अत्यंत गरजेचे


**ज्योतिर्मय साहित्य**

व्यक्त होणारीच व्यक्ती असते; अशाच व्यक्तीचं व्यक्तिमत्व चार चौघांपेक्षा निराळं असतं. खरं तर, व्यक्त न होणारा जीव ह्या भूतलावर सापडणे विरळाच. जन्माला आलेला प्रत्येक जीव काही ना काही प्रकारे व्यक्त होण्याचा प्रयत्न करतच असतो. ते व्यक्त होणं आवाजाच्या माध्यमातून, लिखित स्वरूपांत, देहबोलीच्या वापरांतून होत असतं. आपल्या अंतर्मनांत येणारे विचार, विषय, घटना, अनुभव आपण अगदी जवळच्या, आपल्या हक्काच्या व्यक्तीजवळ बोलून दाखवत असतो. म्हणजेच एकप्रकारे आपण व्यक्तच होत असतो. तसं करण्यामुळे आपल्या मनांत साठून राहिलेल्या विचार बाहेर पडतात, त्यांना मोकळी वाट करून दिली जाते. निसर्ग नियमानुसार ते गरजेचं असतं.

आपल्या संवादातून, लेखनातून, देहबोलीद्वारे आणि विविध क्रिया-प्रतिक्रियांतून आपण व्यक्त होत असतो. व्यक्त न होणाऱ्या व्यक्तीची घुसमट वाढत जाते. मोकळेपणानं मनांतील विषय एखाद्याला सांगितले कि मनावरचा ताण, दडपण कमी झाल्याचं देखील जाणवतं. ह्या मोकळ्या होण्यातून आपल्या समस्यांचं निराकरण होत जातं. काहीवेळा उद्भवलेल्या प्रश्नांची उकल होत जाते.

मनातील भय, न्यूनगंड दूर होण्याच्या दृष्टीनं मोकळेपणानं आपल्या मनांतील शंका व्यक्त करणं उपयुक्त ठरतं. आपल्याला पडलेले प्रश्न केवळ आपल्याच भ्रम आणि संभ्रमामुळे निर्माण होत असतात. प्रत्येक वेळेला प्रत्येक प्रश्नाची उत्तरं सारखी नसतात, प्रत्येकाचे प्रश्न निराळे असतात, उत्तरेही प्रत्येकासाठी भिन्न असतात. जसं व्यक्ती तितक्या प्रकृती तसंच, जसे प्रश्न तशी त्यांच्यासाठी उत्तरे, हे लक्षात घेणं जरुरीचं असतं. एखाद्या समस्येचं उत्तर सर्वांनाच लागू होतं असं नाही, हेही समजून घेणं आवश्यक असतं.

## दक्षिण भारतातील अप्रतिम मंदिरे ( भाग एक)





**ज्योतिर्मय साहित्य**

मुलाची बदली बंगलोर येथे झाल्यामुळे आम्ही ही २०२४ ची दिवाळी बंगलोर येथे घालवण्याचे ठरवले. मुलालाही दोन तीन दिवस सुटी असल्याने बंगलोर येथून साधारणपणे २०० किमी अंतरावर असलेल्या हसन येथे जाऊन आम्ही तेथील मंदिरे पाहण्याचे ठरवले. मंदिरे पाहण्याचे काही नियोजित नव्हते पण ही सुदैवाने ही संधी चालून आली. मंदिरे पाहिल्यानंतर आपण योग्य तोच निर्णय घेतला याचा आनंद झाला. या मंदिरांबद्दल पूर्वी कधीतरी ऐकलेलं होतं पण ती पाहण्याचा योग आता जुळून आला होता. या मंदिरांची वास्तूरचना, बांधणी, त्यावरील अप्रतिम शिल्पकाम पाहून थक्क झालो. त्यांच्या अनुपम सौंदर्याचे वर्णन करणे आणि शब्दातून ते सांगण्याचा प्रयत्न करणे खरोखर कठीण आहे कारण ती पाहण्याची आणि अनुभवण्याचीच गोष्ट आहे. तरी देखील माझ्या दृष्टीला ती जशी वाटली तशी आपल्यासमोर सादर करण्याचा प्रयत्न आहे. साधारणपणे हजार बाराशे वर्षांपूर्वी ज्या होयसळ राजांनी ती बांधली त्यांच्या रसिकतेचे, कलाप्रेमाचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे हजार-बाराशे वर्षांपूर्वीचा इतिहास आज आपल्या डोळ्यासमोर या मंदिरांच्या रूपाने उलगडतो. मंदिरे, मूर्ती, मंदिरातील भिंतीवर कोरलेले प्रसंग यातून इतिहास जिवंत होतो. आपण या प्राचीन गौरवशाली इतिहासाचे साक्षीदार बनतो.



आमची ही प्रेक्षणीय सफर १ ते ३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत झाली. ही मंदिरे पाहण्यासाठी हसन हे जिल्ह्याचे ठिकाण सोयीचे होते. त्यामुळे त्याच ठिकाणी एका हॉटेलमध्ये मुक्काम करून दोन दिवस मंदिरे पाहण्यात घालवले. कर्नाटकातील या हसन जिल्ह्याला अत्यंत प्राचीन उज्ज्वल असा वारसा आहे. हा प्रदेश म्हणजे परंपरा, कला आणि या मंदिरांसारख्या भव्य ऐतिहासिक वास्तूंचे माहेरघर म्हणता येईल. त्याचप्रमाणे निसर्ग सौंदर्याचे अप्रतिम वरदानही या प्रदेशाला लाभले आहे. हिरवीगार वनराई डोळ्यांना सुखावते. या भागात होऊन गेलेले होयसळ राजे अत्यंत रसिक, कलाप्रेमी आणि कलाकारांना उत्तेजन देणारे होते. मंदिरांवर कोरलेल्या चित्रांवरून त्यांच्या काळात शिल्पकला, नृत्य, नाट्य, गायन, वादन आदी कलांना आश्रय मिळालेला दिसतो. त्यांच्या काळात मंदिराच्या भव्य वास्तू अस्तित्वात आल्या. आपल्या दोनशे वर्षांच्या कारकिर्दीत कर्नाटकसह इतर ९५२ ठिकाणी या राजांनी १५२१ मंदिरे बांधली. यावरूनच त्यांनी केवढा भव्य वारसा मागे ठेवला आहे, त्याचा अंदाज आपल्याला येऊ शकतो. या मंदिरांपैकी ४५२ मंदिरे आजही सुस्थितीत आणि अत्यंत प्रेक्षणीय अशा अवस्थेत आहेत. भारतीय पुरातत्व खात्याच्या देखरेखीखाली असलेल्या या स्थळांना जागतिक वारसा म्हणून मान्यता मिळाली आहे. हा वारसा काळजीपूर्वक जतन केल्यानेच आज आपल्याला सुस्थितीत बघायला मिळतो. देश विदेशातील अनेक पर्यटक आवर्जून ही मंदिरे पाहण्यासाठी इथे गर्दी करतात. आपला प्राचीन भव्य ऐतिहासिक वारसा जाणून घ्यायचा असेल तर या मंदिरांना अवश्य भेट दिली पाहिजे.

(क्रमश:)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## विरक्त लक्षण

**ज्योतिर्मय साहित्य**

भगवंताचे प्रेम ऊदय पावल्याची अवस्था, वासना क्षीण झाल्याची अलीप्तपणाची अवस्था योगाभ्यासाने येणारी अवस्था, ध्यान साधल्यावरची अवस्था, देहाचे भान लोपल्यावर होणारी अवस्था, तुर्या पचनी पडल्यावरची अवस्था यासर्व साक्षात्कार लक्षणाचे ज्ञान विरक्ताला असावे.


विरक्त योगी असावा,योगक्रिया, योगासने, विधी व विधानाचेज्ञान अवगत असावे. विरक्ताकडे आपपर भाव नसावा. सगगळ्यांशी प्रेमाने सौदाहर्याने तन, मन, धन देऊन आदर्शवादी जीवन अंगीकारलेले असावे. तो लोभी नसावा.थोडक्यात काय तर विरक्ताने जगन्मित्र असावे.मोकळे व बंधनमुक्त जीवन जगावे. पण आपल्या पासून कुणालाही त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. शास्त्राच्या सर्व अंगाचा विचार करू, अभ्यास पूर्ण वर्तन करून भगवंत प्राप्तीची ईच्छा असणाऱ्या सर्व समाजाला शुध्द साधन मगर्गाला लावावे. परमार्थ सांगत असताना समाजमनावर जर शंकांचे गारूड असेल तर ते दूर करावे.

विरक्त स्वत:भगवंत भक्तीत लीन झालेला असावा . तो सदवर्तनी,सदाचारी, हठयोगी, ऊत्तम वक्ता, प्रवाहीवाणी, आरोग्यसंपन्न, पराकोटीचा भक्तीमार्ग अवलंबणारा असावा.

मित्रांनो या समासातील संतवचने मला जेवढी समजली, ऊमजली तेवढी श्रोत्यापुढे मांडण्याचा प्रयत्न केला. काही ऊणे असेल तर माझ्या कडे अधिक असेल ते समर्थाच्या चरणांशी भावसुमनांजली समजून वहाते व विरक्त लक्षणनाम समास नववा समाप्त करत आहे.

श्रीराम जय राम जय जय राम
जय जय रघूवीर समर्थ

## नामाचे प्रेम का येत नाही ?



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

आज इतकी वर्षे होऊन गेली तरीसुद्धा ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास यांच्यासारख्या थोर संतांचे नाव टिकून राहिले आहे. याचे खरे कारण हे की, त्यांचे नामावर अत्यंत प्रेम होते. या सर्व संतांच्या वचनांवर आपण विश्वास ठेवतो. त्यांच्याप्रमाणे नामाचे प्रेम आपल्यालाही यावे असे आपल्याला वाटते. पण ते प्रेम आम्हाला का उत्पन्न होत नाही, याचा विचार आपण करायला पाहिजे. त्या नामाला उपमा देताना, ते अमृतापेक्षाही गोड आहे असे त्यांनी सांगितले. नामाला अमृताची उपमा देताना, त्या अमृताच्या पलीकडे दुसरी गोष्टच नाही असे आपण म्हणतो. मग त्या नामाचे प्रेम आम्हाला का बरे नसावे ? तर त्या नामाच्या आड काही तरी येत असले पाहिजे हे खास. ज्याप्रमाणे आपण तोंडात साखर घातल्यावर आम्हाला जर ती गोड लागली नाही, तर तो दोष साखरेचा नसून आमच्याच तोंडाला चव नाही असे आपण म्हणतो, त्याप्रमाणे नामाची गोडी आमच्या अनुभवाला येत नसेल, तर आमच्यामध्येच काही तरी दोष असला पाहिजे खास.

नामाचे प्रेम येण्याला बहुतेक लोक काही ना काही अडचणी सांगतात. कुणाला विचारले, ''नामाचे प्रेम का येत नाही ?'' तर तो सांगतो, ''माझे लग्न झाले नाही. ते होऊन प्रपंच, मुलेबाळे हे सर्व झाल्यावर मला नामाचे प्रेम येईल.'' पण लग्न करून मुलेबाळे असलेल्या किती लोकांना नामाचे प्रेम लागले आहे ? कोणी म्हणतो, ''पैसा नाही म्हणून प्रपंचाची काळजी वाटते आणि नामाचे प्रेम येत नाही.'' परंतु अगदी भरपूर पैसा असलेल्या किती लक्षाधीशांनी नामाचे प्रेम मिळविले आहे ? कोणी म्हणतो, ''या प्रपंचात बायकोमुले, आजारपण, शेतीवाडी यांच्या व्यापामुळे आम्हांला नामाचे प्रेम लागत नाही;'' तर कोणी म्हणतो, ''प्रपंचात राहून मला आता कंटाळा आला आहे; मी आता संन्यास घेतो, म्हणजे मला नामाचे प्रेम येईल;'' तर कोणी प्रापंचिक दु:खाला कंटाळून अगदी आत्महत्या करायला निघतो. अशा रीतीने, सर्वजण ज्या परिस्थितीत असतात त्या परिस्थितीत नामस्मरणाला अडचणच सांगत असतात. नामाचे प्रेम न यायला खरोखरच परिस्थिती कारणीभूत आहे का, याचा विचार आपण करायला पाहिजे. मला वाटते, नामाचे प्रेम न यायला खरोखर कारण कोणते असेल, तर भगवंत हवा असे आम्हाला मनापासून वाटतच नाही. भगवंत हवा आहे असे वाटणे, हे खरोखर भाग्याचे लक्षण आहे. तुम्हाला खरोखरच भगवंत हवा आहे असे वाटू लागले म्हणजे त्या हवेपणातच त्याच्या प्राप्तीचा मार्ग दिसू लागेल.

नामाची गोडी अशी विलक्षण आहे की, ज्याला ती लागली त्याला स्वत:चे भान राहात नाही. म्हणून नामाला वाहून घ्यावे.




## ऐकण्यातला आनंद

**ज्योतिर्मय साहित्य**

पुर्वाध

वाचक मित्र हो नमस्कार

तुम्ही या लेखनास मोठा प्रतिसाद देता आहात, त्याबद्दल तुम्हा सर्वांचे आभार मानतो व आजच्या लेखास आरंभ करतो. आपल्या जन्मापासून आपणा सर्वांना देवाने ''कान ''दिलेले आहेत त्याच्या कडून मिळालेल्या गिफ्ट बद्दल आपण कधी आभार मानले आहेत का ? नव्यांनव टक्के उत्तर ''नाही बुवा''असेच येईल, कारण ''देवाने दिले त्याबद्दल आभार वगैरे मानायचे असतात '' हे आपल्या मनात येत नाही. असो.

तर पालण्यातल्या दिवसापासून आपल्याला अनेक गोष्टी काळण्याचे कारणच आपले दोन कान '' ,ऐकणे हे त्यांचे काम.

ध्वनी, स्वर, शब्द, यांच्या श्रवणामुळे आपल्याला स्वरज्ञान,शब्दज्ञान होऊ लागते.

बाळाच्या बोबड्या शब्दातील ''आई '' शब्द पहिल्यांदा ऐकून आईला किती आनंद होत असतो हे एक आई सांगू शकतो.

ज्या घरात अनेक माणसे असतात त्या घरातील बाळाच्या कानावर इतके विविध शब्द पडत असतात की त्याला बोलण्यास शिकवावे लागत नाही, उलट मोठ्या झपाट्याने ते बोलण्यास शिकू लागते.

ऐकणे म्हणजे श्रवण करणे '' ही श्रवण-शक्ती ज्यास लाभते तो उत्तम श्रोता होतो, समोरच्या व्यक्तींचे बोलणे शांतपणे ऐकून घेतो, समजून घेतो '' अशा व्यक्ती बोलणाऱ्याला आनंद देत असतात. डोळ्यांनी पाहिलेले दृश्य आणि कानांनी ऐकलेले शब्द '' या दोन गोष्टी सत्य असतात असे मानले जाते.

श्रवण आनंद ,ऐकण्याचा आनंद देणारी एक वस्तू, एक साधन जगभरातील लोकांमध्ये अतिशय प्रिय आहे. ज्याला आपण रेडिओ ''म्हणतो.

आमच्या पिढीचे स्वर-संगोपन या रेडिओने केले आहे. आकाशवाणीच्या चिरपरिचित धून रेडिओवर वाजली म्हणजे सकाळ झाली रे, चला उठा ,लोळत पडू नका, असे मोठी माणसे म्हणायची. मोठे टेबल रेडिओ कालबाह्य झाले आणि ट्रान्झसिस्टरचा जमाना आला,

फिल्मी गाणी माळरानावर ऐकू येऊ लागली. ज्याची त्याची स्वतंत्रपणे रेडिओ ऐकण्याची ,कधीही ऐकण्याची संधी या छोट्या रेडिओने मिळवून दिली.

रेडिओ सिलोन-म्हणजेच श्री लंका ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन हिंदी फिल्म संगीत विषय कार्यक्रम ऐकवणारे सर्व प्रिय रेडिओ केंद्र. अमीन सायानी निवेदक आणि त्यांचे ''बिनाका गीतमला'' सादरीकरण आणि बुधवार '', जनमानसात ''ऐकले गेलेले सर्वाधिक कार्यक्रम '' त्याचे हे अद्भुत उदाहरण आहे.मित्र हो -

...श्रवण- आनंद '' इतक्यात संपणारा नाहीये.. उत्तरार्धात अजून काही....

***



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**दानं भोगो नाशस्तिस्त्रो गतयो भवन्ति वित्तस्य।**
**यो न ददाति न भुङ्क्ते तस्य तृतीया गतिर्भवति।।**

अर्थ - दान, भोग, नाश या तीन प्रकारच्या अवस्था धनाच्या असतात. जो व्यक्ती धनाचे दान करीत नाही, उपभोग घेत नाही, त्याच्या धनाला तृतीय अवस्था प्राप्त होते. अर्थात ते धन नष्ट होते. म्हणून धनाचे दान करावे, त्याचा उपभोग घ्यावा, हेच उत्तम होय.

माणसाकडे जे धन असते, त्याच्या तीन अवस्था निश्चित असतात: दान, भोग आणि नाश. माणसाने दान करावे, धनाचा उपभोग घ्यावा अन्यथा त्या धनाचा नाश अटळ असतो, असे प्रतिपादन या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी केले आहे.



आरोग्य संजीवनी

## पिंपळाच्या झाडात दडलाय आरोग्याचा खजिना

**ज्योतिर्मय साहित्य**

पिंपळाच्या झाडाला मोठी ओळख आहे. पिंपळाच्या झाडामध्ये अनेक औषधी गुणधर्म दडलेले आहेत. या झाडाच्या पानांपासून ते फळे आणि मुळांपर्यंत सर्व भाग फायदेशीर आहेत. पिंपळ हे सर्वात जास्त ऑक्सिजन देणारे झाड आहे. त्यात प्रथिने, चरबी, कॅल्शियम, लोह आणि मँगनीज यांसारखे अनेक आवश्यक पोषक घटक असतात. आयुर्वेदानुसार पीपळाच्या झाडाने अनेक आजारांवर उपचार करता येतात. या झाडामध्ये असलेले गुणधर्म श्वास, दातदुखी, सर्दी, खाज आणि नाकातून रक्त येणे यासारख्या समस्या दूर करण्यासाठी प्रभावी आहेत.

**श्वसनाच्या समस्यांवर आराम मिळतो...**

श्वसनाच्या रुग्णांसाठी पिंपळ फायदेशीर आहे. फुफ्फुसांना मजबूत करण्यासाठी पिंपळाच्या सालाची पावडर वापरली जाते. पिपळाच्या सालाचे चूर्ण सुकल्यानंतर घेतल्यास श्वसनाच्या समस्यांवर आराम मिळतो.

**दातांसाठी चांगले...**

पिंपळ दातांसाठी फायदेशीर आहे. पिंपळाच्या काड्यांमध्ये असलेले गुणधर्म दातांसाठी फायदेशीर असतात. पिंपळाच्या काडीने दात घासल्याने दातांच्या समस्यांपासून सुटका मिळते. दातदुखीचा त्रास पिंपळाच्या मदतीने दूर होतो.

**खाज सुटणे...**

पिंपळमध्ये असलेले गुणधर्म त्वचेसाठीही फायदेशीर आहेत. पिपळाच्या पानांचा रस तयार करून प्यायल्याने त्वचेच्या समस्या दूर होतात. पिंपळाच्या पानांचा उष्टा करून प्यायल्यानेही फायदा होतो. या गोष्टींचे सेवन केल्याने खाज आणि खाज येण्याची समस्या दूर होते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

**उपचार करणारा म्हणून काम करा...**

पिंपळाचे पानही जखमा भरण्याचे काम करते. पिंपळाचे पान गरम करून जखमेवर लावा. यामुळे दुखण्यातही आराम मिळेल आणि जखम लवकर भरून येण्यासही मदत होईल. जखमेवर पिंपळाच्या पानांची पेस्टही लावू शकता, ते मलम म्हणून काम करेल.

**तणाव कमी करा...**

पिंपळाच्या पानांमध्ये अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. ते तणाव दूर करण्यास मदत करतात. जर तुम्हाला तणावाची समस्या असेल तर तुम्ही पिंपळाच्या पानांचा रस बनवून पिऊ शकता.

**नाकातून रक्त येणे...**

नाकातून रक्त येण्याची समस्या दूर करण्यासाठी पिंपळाची पाने उपयुक्त आहेत. पिंपळाच्या पानांचा वास घेतल्याने नाकातून रक्त येणे थांबते. याशिवाय पिंपळाचा रस नाकात टाकल्याने नाकातून रक्तस्त्राव कमी होतो.

## आचरणात आणावे असे





**ज्योतिर्मय साहित्य**

जिवनाच्या परीक्षेत कोणतेही गुण नसतात लोकांच्या हृदयात स्थान मिळवलंत तर समजा तुम्ही पास झालात जिथे जिव्हाळ्याचा पाऊस पडतो तिथे झोपडीलाही राजवाड्याचं स्वरुप येतं. चुलीतून निघणारा धूर एखाद्या भिंतीला काळे करू शकतो,पण आकाशाला काळे करण्याचे सामर्थ त्या धुरात नसतं कारण या जीवनात कधी कुणाचा काळ असतो,तर कधी कुणाची वेळ असते. तुमचा कोणीही तिरस्कार केला तरी तुम्ही तुमचा चांगुलपणा सोडू नका,जेथे निर्मिती आहे याचे निर्माल्य सुद्धा ठरलेले असते म्हणून आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा आनंद घ्यायला शिका जीवन हे क्षणभंगुर आहे, त्याला आनंदी बनवा.

म्हणून आपण रागात काहीतरी बोलून जातो आणि दुसर्याच्या मनावर असेच ओरखडे उठतात, नंतर शांत झाल्यावर आपल्याला चुक कळते, पण दुसर्याच्या मनावरील ओरखडे तसेच रहातात. दुसऱ्याच्या मनावर झालेले ओरखडे कसे मिटवणार ? लक्षात ठेव , रागाच्या भरात कधीही दुसर्याला बोलू नकोस , जेणेकरून राग विरल्यावर तुला खेद व्यक्त करावा लागेल!

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

हा भारतभाग्यविधाता कोण हे जरा समजून घेण्याचा प्रयत्न करू. रवींद्रनाथांना अपेक्षित असलेला हा भाग्यविधाता म्हणजे केवळ एखाद्या भूप्रदेशावर आपले वर्चस्व असलेली पंचम जॉर्ज यांच्यासारखी एखादी व्यक्ती कदापिही शक्य नाही. रवींद्रनाथांना अपेक्षित असलेला हा भाग्यविधाता म्हणजे सर्व सृष्टीचा ईश्वर ज्याला ते मास्टर निर्मिक किंवा मास्टर पोएट म्हणून वेगवेगळ्या वेळी उल्लेख करतात. त्याशिवाय रवींद्रनाथांच्या कवितेत वेळोवेळी असे निनावी व्यक्तिमत्व पाहायला मिळते. त्या शक्तीला त्यांनी जगन्नियंता किंवा विश्वाचे संचालन करणारी शक्ती अशा स्वरूपातच पाहिले आहे. उदा. मागील लेखातील या काव्यपंक्ती पहा. एका प्रसंगी त्यांनी पाहिले की शारदातले ढग निळ्या आभाळात विहार करताना खाली असलेल्या भाताच्या पिकावर छाया धरीत तरंगत होते. ह्या अद्भुत दृश्याचा त्यांच्या मनाने ताबा घेतला. त्यांना हे सुंदर दृश्य निर्माण करणाऱ्या कारागिरांच्या हातांची आठवण झाली. आपल्या कवितेत ते म्हणतात

खेळ चालिला आज लपंडावाचा
छाया आणि प्रकाशाचा
भाताच्या शेतातून,
झपाट्याने जाताना,
निळ्या आकाशात
तरंगणाऱ्या पांढऱ्या ढगांचा ,
ताफा हाकणारा तो कोण आहे बरं ?

या अदृश्य हातांचा शोध घेण्याची त्यांना नेहमीच उत्कंठा असायची. तोच त्यांचा भारतभाग्यविधाता आहे.

भारतभूमीवर त्यांचे किती प्रेम आहे ते त्यांच्या एका कवितेच्या ओळींमधून स्पष्ट होईल. या ठिकाणी या ओळी लिहिताना मला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सागरा प्राण तळमळला या कवितेची आठवण येते. रवींद्रनाथ म्हणतात

सार्थक जनम आमार जन्मेछि एइ देशे ।
सार्थक जनम मा गो, तोमाय भालबेसे ।।
जानि ने तोर धन रतन, आछे कि ना रानीर मतन ।
शुधु जानि आमार अंग जुडाय तोमार छायाय एसे ।।

या देशात जन्माला आलो म्हणून माझे सार्थक झाले. माते, तुझ्यावर प्रेम केल्याने माझा जन्म सार्थक झाला. तुझ्याकडे किती रत्नभांडार आहे, ते मला माहिती नाही. तू राणीसारखी आहेस का हेही ठाऊक नाही. मला फक्त एवढेच ठाऊक आहे की तुझ्या सावलीत मला शांती मिळते.

त्यांचं देशप्रेम इतकं उत्कट आहे की या देशात त्यांना विश्वदेवाचं दर्शन घडतं.

हे बिश्वदेब, मोर काछे तुमि देखा दिले आज कि बेशे ।
देखिनु तोमारे पुर्बगगने, देखिनु तोमारे स्वदेशे ।।

विश्वदेवाचे रूप त्यांना कसे भासते ? तर नील गगन त्याचे भाल आहे. स्वच्छ प्रकाशात त्याला अखंड उज्ज्वलता प्राप्त झाली आहे. हिमालय जणू आशीर्वादरूपी कर उंचावून निर्भयतेचा वरदहस्त देत आहे. हा सागर त्याचे चरण धुतो आहे. जान्हवीरुपी हार त्याच्या वक्षावर रुळतो आहे. आपल्या देशातच आपल्याला परमेश्वराचे दर्शन होऊ शकते हेच जणू त्यांना सांगायचे आहे.

# श्री भावार्थ रामायण...

**ज्योतिर्मय साहित्य**

नाथांच्या जीवनांतील अखेरच्या कालखंडातील शेवटचा आणि महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणजे भावार्थ रामायण होय. उदात्त मानवीय मूल्यांची जननी असलेल्या, भारतीय संस्कृति व सभ्यतेच्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणून मान्यता पावलेल्या, सर्वाधिक लोकप्रियता लाभलेल्या आदिकवी वाल्मीकि रचित 'रामायण' या ग्रंथावर प्राकृत भाषेत टीका असलेला हा ग्रंथ 'भावार्थ रामायण.

नाथांनी आपल्या निर्मळ अंतः करणाने, विशुद्ध आचरणाने अखंड हरिचिंतनाने व उत्कट भावभक्तीने प्रभू श्रीरामाच्या हृदयामध्ये भरतासम स्थान निर्माण केले. प्रभूंनी प्रसन्न होऊन रामायणाचा भावार्थ शब्दबद्ध करण्याचा आदेश दिला, सद्गुरुकृपांकित नाथांनी विवेकपूर्ण भक्तीभाव व अनन्य प्रेम निष्ठेने ओथंबलेल्या आपल्या विचार भावनांना शब्दरूप दिले, आणि नित्यनूतन, चिरंतन, भावभक्ती समृद्धीपूर्ण असे 'भावार्थ रामायण' साकार झाले.

भावार्थ रामायणाने जिज्ञासू व आर्त भक्तांच्या मनबुद्धीची तृप्ती झाली. ज्ञान-विज्ञान, विवेक-वैराग्य, गुरूसेवा, गुरुकृपा या सार्यांना प्रभू श्रीरामचंद्राच्या भक्तीरसात रंगून जाऊन आपला जन्म सार्थकी लावू इच्छिणार्या धर्मप्रवण आबालवृद्धांसाठी आणि साक्षेपी, पुरुषार्थी अशा धीर-वीर वाचकांसाठी श्रीसंत एकनाथांनी कोदंडधारी रामायणाचे चरित्र भावार्थ रामायणात गायले.

'भावार्थ रामायण' एक प्रासादिक महाकाव्य आहे. महाराष्ट्र शारदेच्या कंठातील कौस्तुभमणी आहे. या ग्रंथात भक्ती-भावगंगा दुथडी भरून वाहते आहे. ग्रंथातील ओवीबद्ध उत्कट प्रसंगातून नाथांच्या दिव्य प्रतिभेची, प्रभुदत्त प्रज्ञेची व रामभक्तीची साक्ष ठायी-ठायी लक्षित होते. ग्रंथात गंगेचे ज्ञानपावित्र्य आहे. यमुनेचे भावमाधुर्य आणि सरस्वतीचे मांगल्यनिधान प्रकर्षाने जाणवते आहे. ही शुद्ध, सात्त्विक, अनिर्वचनीय कलाकृती रामभक्तीवर अधिष्टीत असल्याने या ग्रंथातील विचार आणि भाव त्रिकालबाधित व विश्वव्यापक झाले आहेत.

सर्वसामान्यांना भक्तीरसात निमग्न करण्याचे सामर्थ्य असलेल्या या प्रासादिक ग्रंथात सात काण्ड, २९६ बालकाण्ड अध्याय व सुमारे चाळीस हजार ओव्या आहेत. ग्रंथाचा युद्धकांडातील ४४ व्या बालकाण्ड अध्यायापर्यंतचा भाग स्वतः श्री एकनाथ महाराजांनी लिहिला असून नाथांच्या निर्वाणानंतर त्या पुढील अखेरपर्यंतचा कथाभाव श्री संत गावबा महाराजांनी लिहिला आहे. 'गावबा' हे नाथांचे अंतरंग शिष्य होते. ते बालपणापासूनच नाथांच्या सहवासात होते..

त्यांनी आपले संपूर्ण जीवन हरिभक्तीमध्ये व नाथसेवेत समर्पित केले होते. नाथांनी गावबांना 'भावार्थ रामायण' हा ग्रंथ पूर्ण करण्यासाठी त्यांच्या मस्तकी वरदहस्त ठेऊन, कृपाशीर्वाद देऊन, आदेश दिला होता. गुरुआज्ञा शिरसावंद्य मानून, प्रभूचरणी कृपेचे वरदान मागून, श्री संत गावबा महाराजांनी युद्धकाण्डातील ४५ व्या बालकाण्ड अध्यायापासून उत्तरकाण्डापर्यंतचे संपूर्ण भावार्थ रामायण लिहिले.

**सौ. सुनिता दिपक कावसनकर**
**कवयित्री/लेखिका,**
**संपादिका,युंगधरा साप्ताहिक**
**प्रकाशिका,युगंधरा पब्लिकेशन**

श्री संत गावबाकृत भावार्थ रामायणाचे लेखन गुरुसेवा व गुरुकृपेच्या बळावर इतके सुंदर व भावपूर्ण झाले आहे की ही नाथांची रचना नाही असे कोणीही म्हणू शकणार नाही. नाथांचा सहवास, नित्यश्रवण, मनन, चिंतन, भक्ती आणि गुरुसेवेचा ध्यास यामुळे गावबा संतत्व पावले. ग्रंथरचना करण्यास समर्थ झाले. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामाच्या अमोघ चरित्रलेखनाचे महत्कार्य पूर्णत्वास नेऊ शकले.

भावार्थ रामायणाची भाषा अत्यंत सुलभ व प्रसादपूर्ण आहे. यात शब्दरत्नांच्या भांडारातील सर्वोत्कृष्ठ सार्थक शब्दांची गुंफण, ओवी ओवीतून भाव-विचारांच्या विश्वाला प्रभुचरणी समर्पित करते. नाथांची व गावबांची समर्थ कवित्वशक्ती पदोपदी जाणवते. मानवी भावनांचे, विचारांचे, विकारांचे, कल्पनांचे भावरम्य वर्णन त्यांच्या असामान्य प्रतिभेची साक्ष देते.

विविध प्रसंगातून साकार होणारे हर्ष, शोक, आनंद, आश्चर्य, करुणा, वीर, व्यक्तिस्वभावोचित भावरस ही यथास्थानी उत्तमरीतीने प्रकट झाले आहेत. श्रीराम, सीता, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, दशरथ, कौसल्या, कैकयी, सुमित्रा, मंथरा, हनुमान, सुग्रीव, रावण, बिभीषण आदि व्यक्तिरेखा नाथांनी आपल्या दैवी प्रतिभेने सजीव केल्या आहेत.



प्रस्तुत ग्रंथातील कौसल्येचे डोहाळे, रामजन्म, मंथरा-कैकयी संवाद, राम-भरत भेट, पंचवटी प्रसंग, सीता-हनुमान भेट इत्यादि अनेक प्रसंग खूपच मनोज्ञ झाले आहेत. भक्तांचे अधिदैवत राजा रामचंद्र व्यक्तिमत्व बहुआयामी आहे. आदर्श पुत्र, आदर्श राजा, आदर्श बंधू, आदर्श शिष्य, आदर्श मित्र, आदर्श योद्धा, सर्व सर्व दृष्टीने राम आदर्श पुरुषोत्तम आहे.

त्याच्या प्रत्येक उक्ती-कृतीमध्ये आदर्श दडलेला आहे. श्रीराम आणि रामायण आम्हा भारतीयांचा आदर्श प्राण आहे. आदर्श जीवनाचा प्रेरणास्त्रोत आहे. श्रीराम व रामायणावर हजारो वर्षांत असंख्य कलाकृती निर्माण झाल्या आहेत व त्यामध्ये श्रीसंत एकनाथकृत 'भावार्थ रामायण'चे स्थान अनन्यसाधारण आहे.

(आम्हीं सर्व कावसानकर हे श्री संत गावबा महाराज कुलकर्णी याचे वंशज आहोत)

# नको गं बाई ही एकांकिका आणि आम्ही लग्नाळू हे प्रहसन उत्साहात सादर

**ज्योतिर्मय साहित्य**

**जालना** – जागतिक रंगभूमी दिनानिमित्त राज्याचा सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय व उत्कर्ष थिएटर यांच्या वतीने आयोजित नाट्यमहोत्सवात १७ मार्च रोजी नको गं बाई ही एकांकिका आणि आम्ही लग्नाळू हे प्रहसन उत्साहात सादर झाले.

चुन्नीलाल गिरीलाल सभागृह, जे. ई.एस. महाविद्यालय येथे आयोजित या महोत्सवाची संकल्पना सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशिष शेलार यांची होती. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग विकास खारगे व सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी आयोजन केले होते.

एकांकिका व प्रहसनाचे लेखन सतीश लिंगडे यांनी तर दिग्दर्शन सुमित शर्मा यांनी केले. यामध्ये विनोद जैतमहाल, रेखा चव्हाण, सुकृती काकडे, सानवी जोशी, पवनकुमार खांदे, अथांग लिंगडे, गणेश लोखंडे, सतीश लिंगडे व सुमीत शर्मा शर्मा यांनी मुख्य भूमिका निभावल्या. संगीत आनंद घुले, ओंकार सुलाखे, शोएब शेख व नीलेश सपकाळ यांचे होते. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, डॉ. सुरेश साबू, कवयित्री व नाट्यसमीक्षक डॉ. संजीवनी तडेंगावकर यांच्यासह प्रेक्षकांची उपस्थिती होती.



# सामाजिक आशयाची अभंगसरिता

**ज्योतिर्मय साहित्य**

अभंग छंदात फक्त संतांनीच लिहायचे इतरांनी नाही असा समज एकेकाळी रूढ होता. परंतु तरनोळी, ता.दारव्हा येथील रचनाकारांनी आपल्या सर्वच रचना अभंग छंदात लिहिल्या आहेत, त्यादेखील तंत्रशुध्द आणि अचूक. प्रत्येक रचना निर्दोष असावी याकडे त्यांनी लक्ष दिले आहे. ते विविध नियतकालिकांतून तसेच व्हाट्सप ग्रुपवर अभंग लिहीत असतात. अभंगसरिता नावाचा संग्रह त्यांनी हल्लीच प्रसिध्द केला आहे.

माणसाने कसे जगावे ते सांगताना अजयजी म्हणतात तुज पाहताना जग सुखावेल । तुला पाहिल्यावर जगाला समाधान लाभेल आणि तुझ्यापुढे शत्रूही झुकेल असा वाग.

शिवरायांना वंदन करताना ते म्हणतात,

रयतेचे राजे। स्वराज्याचे धनी। सदैव वदनी शिवराय । शिवरायांचे स्मरण सतत करावे. दैत्यांशी वैर करणारा शौर्यवान राजा । त्यांना आम्ही हृदयात ठेवतो.


आपल्याला हवे ते कधी मिळत नाही. म्हणून रडत बसू नये त्यावर मात करावी. अंधार सरला की उजेड दिसतो । आज जे तुझे वैरी आहेत, ते तुझ्याकडे धन येताच मित्र होतील, परंतु असल्या मित्राची संगत धरू नकोस, जे दैत्यवृत्तीचे आहेत. सत्याची वाट नेहमी धरावी. जी खडतर असेल परंतु त्याची साथ धरू नकोस.

हिंसेमुळे फक्त शत्रुत्व वाढते. त्यामुळे भूमीवर शत्रूच नकोत. या नश्वर देहाचा अभिमान बाळगू नको. देणाऱ्याने देत जावे, असे विंदांनी सांगितले तसेच अजय चव्हाण म्हणतात, देणारा कधीच घेत नसतो. तो सदैव देतच असतो. त्या देणाऱ्यांचे उपकार विसरू नको. दात्यास हृदयी ठेवावे त्याच्याविषयी कृतज्ञ असावे. भक्तीपर अभंगात ते म्हणतात, अभंग हे भक्तीचे साधन आहे. आई हाच पृथ्वीवरील ईश्वर आहे, हे विसरू नको. तुझ्यावर ती संस्कार करते. तिचे स्मरण कर. आपण आधी तिला पूजतो व नंतर देवा तुला स्मरतो, अशी कृतज्ञता ते बाळगतात.

दुष्टांना सजा देव देतो. तू कुणाला छळू नको. कर्तव्य हेच कर्म मान. द्रव्याचा हव्यास बरा नव्हे हा इशारा ते देतात. बुध्दाचे स्मरण करावे व कुणाशी वैर करू नको, असे ते सांगतात. भक्तिपेक्षाही कर्म श्रेष्ठ असते. सावित्रीबाई फुले यांचेही ते स्मरण करतात व लढायला शीक असे म्हणतात. फक्त मुखात नाम यावे. पांडुरंगा मी तुझा ध्वज हाती धरला आहे. मला मोक्ष नको, भक्तीचे सुख द्यावे, अशी प्रार्थना करतात. अन्याय होताना ते गंभीर होतात, कुणा निरपराधाला फासावर जाताना देव तू धावून ये. परिवर्तनासाठी बळ दे अशी मागणी विठ्ठलाकडे ते करतात.

ज्ञान मिळवण्यासाठी वाटेल ते कष्ट घ्यावेत मात्र कुणाच्या आधीन होऊ नये. माणुसकीचा धर्म जतन करण्यास विद्यार्थी व्हावे, असे त्यांचे स्वप्न आहे. शिक्षकांनी विद्यादान करावे. विद्यार्थ्यांनी ते ग्रहण करावे, शाळेत जाऊन साक्षर व्हावे, असा ध्यास ते घेतात. पुस्तकांशी एकरूप व्हावे हाच विद्यार्थी धर्म असतो.

भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणे सुख वा दुःख समान मानावे, मान आणि अपमान समान मानून त्याचा अंगीकार करण्याचे बळ ईश्वराल ते मागतात. व्यसनांपासून दूर राहावे, अहंकार टाळावा व माणुसकीचा धर्म पाळावा, असे ते सुचवतात. माणुसकीचा धर्म अंगीकारून सत्याची कास धरण्याचा आग्रह ते धरतात. आलेल्या संधीला नकार कधीच देऊ नको, तिचे सोने कर. स्वप्नाला तेव्हाच आकार येईल, असे ते सांगतात.





लोकांना निद्रेतून जागे कर. आपली लेखणी जनहितार्थ चालव, असे ते सांगतात. अहिंसेची पूजा करून निर्भय होऊन लेखणी चालविण्याचा सल्ला ते देतात. सत्यमार्गाने लेखणी चालावी व सुयोग्य रीतीने वागण्याची शिकवण ते देतात.

सुख जसं क्षणभंगूर असं तसंच दुःखही काही काळाने जाईल. प्रत्येकाचा दिवस येईल. उकिरड्याचेही पांग फिटतात. त्यांच्याही दिवस येतो. त्यासाठी कष्ट करीत राहावे, रडून दुसऱ्याचे गाऱ्हाणे करू नये व्यसनाच्या आहारी जाऊ नये. दीन दुबळ्यांसाठी काम करावे व लेखणी झिजवावी असा संदेश ते देतात. हक्कासाठी लढताना परके मात्र ओळखावेत, असे ते सतत सांगत राहतात. एकंदरीत ऐंशी अभंगातून ते जनसेवेचे व्रत घेण्याचे सूचित करतात. सन्मार्गाने वागावे, कोणाचे अहित करू नये असेच ते सांगतात.

**पुस्तक परीक्षण**
**प्रकाश रामचंद्र क्षीरसागर**
**९०११०८२२९९**

अभंग छंद म्हटला तर सोपा म्हटला तर कठीण. कोणतीही सूट न घेता लेखन ही अजयची खासियत आहे. विषय कोणताही त्याला वर्ज्य नाही. केवळ भक्तीचा अभंग होतो असे नाहीतर सामाजिक भान राखूनही संतांनी लेखन केले आहेच. तोच मार्ग अजयने घेतला आहे.

अभंगसरिता – अजय रमेश चव्हाण
पृष्ठे ९६, मूल्य ४८ रुपये
प्रकाशक पायगुण प्रकाशन, अमरावती
पुस्तक परीक्षण : प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
९०११०८२२९९

# बामु नाट्योत्सवात समुद्र नाटकाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले



**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – समुद्र हे नाटक मिलिंद बोकील यांच्या कादंबरीवर आधारित आणि चिन्मय मांडलेकर रूपांतरित नाटक आहे. खोल आंतरिक समजुतीने एकमेकांना स्वीकारत, शांत रसात एकरूप झालेल्या दोन जीवांचा, समुद्राच्या सान्निध्यात विलक्षणपणे उलगडत जाणाऱ्या त्यांच्या भावबंधाचा उत्कट प्रत्यय देणाऱ्या समुद्र या नाटकाने रसिकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले. विद्यापीठाच्या नाट्यगृहात सोमवारी, १७ रोजी हे नाटक सादर झाले.

आपल्याला विविध भावभावनांची आंदोलने आणि त्यावर शांत विचार करायला हे नाटक भाग पाडते. भास्कर आणि नंदनी त्यांचा भावनिक गुंता एकमेकांना समजून घेण्याची प्रक्रिया, दैनंदिन जीवनात कामकाजात, जगरहाटीत कुणापुढे व्यक्त व्हावे हे माणसाला कळत नाही. माणूस कधी-कधी विसरून जातो आणि चुकीच्या ठिकाणी माणूस व्यक्त होतो.

माणसं सोबत असतात पण आपापल्या जगात असतात. ती माणसे आपली स्वत:चीच असतात. संसारात नित्यक्रम सुरूच असतात. नेहमी सहवासात असूनही व्यक्ती भिन्न असतात. अशावेळी पती-पत्नी आपले नित्यक्रम करत असतात. पण, आपल्या मनातल्या भावना एकमेकांपुढे व्यक्त करत नाहीत. माणसाचे मन समुद्र आहे. समुद्र आपल्यामध्ये खूप काही सामावून घेतो. आपल्याला दिसतात त्या नुसत्या लाटा. माणसाच्या मनातल्या अंतरंगात आपण ओळखू शकत नाही. तेच या नाटकात आपल्याला उघडताना दिसते. नंदनी आणि भास्कर सुट्ट्या घालवण्यासाठी एका समुद्रकिनारी रिसॉर्टवर येतात. रिसॉर्टवर आल्यानंतर नंदनी, भास्कर पुढे आपल्याकडून झालेल्या चुकीचा निर्वाळा देते आणि इथेच या दोघांमधील स्त्री आणि पुरुष नात्यांमधील एक कोमल धागा उसवायला सुरुवात होते. दोघांमध्ये तणावाचे वातावरण तयार होते आणि शेवटी झालेल्या चुका स्वीकारून माणूस जगू शकतो. माणसाचं मन समुद्रासारखं होऊ शकतं. अशा गोष्टीचा प्रत्यय भास्करला येतो आणि शेवटी जे झालं ते झालं. गोष्ट सोडून पुन्हा नव्याने नव्याने आपल्या आयुष्याची सुरुवात करायचा विचार भास्कर आणि नंदिनी करतात. या नाटकाचे दिग्दर्शन सौरभ मांडविकर याने केले असून, अभिनय सिद्धेश्वर थोरात आणि प्राजक्ता जैन यांनी केले आहे.

# रंगपंचमी

**ज्योतिर्मय साहित्य**

फाल्गुन पौर्णिमे पासून सुरू झालेला हा होलिकोत्सव ! रंगपंचमी ला त्याची सांगता होते. राधाकृष्णाच्या रासलीलेचा उत्सव, प्रल्हादाच्या भक्तीचा हा उत्सव. थोडक्यात भक्ती प्रीतीचा हा उत्सव जीवनात रंग भरणारा, जीवनाचे रंग खुलविणारा असा आहे. रंगाचं महत्त्व माणसाच्या आयुष्यात जन्मापासूनच आहे . रंग नसते तर ... कल्पना करा किती बेरंग झालं असतं हे जीवन. एवढंसं बिटऱ्या बिटऱ्या डोळ्याचं बाळ, पण पाळण्याला लावलेलं रंगीबेरंगी चिमणाळं बघून कसं गोड हसतं. आईच्या कपाळावरचं लाल चुटुक ठसठशीत कुंकू बघून आईचा चेहरा ओळखतंय. (आता सोकॉल्ड न्यू मॉमला गुगल मावशी हाच सल्ला देतेय, कपाळावर लाल टिकली लावा. म्हणजे बाळाची नजर स्थिर होईल आणि ते तुमच्या कडे बघेल.)

रंगीत खेळणी, कपडे, फुगे, फुले, याकडे मुलंच काय मोठे देखील आकर्षित होतात. सणवार आले की बाजारातील रंगांची दुनिया विचारूच नका. डोळे कसे दिपून जातात .

निसर्गाच्या, ऋतुचक्रातील रंगांची मजा आणखीनच न्यारी. एकच हिरवा रंग पण त्याच्या कितीतरी विविध छटा. ! श्रावण, भाद्रपदातला हिरवा तजेला, आकाशातील कृष्ण मेघ, मधुनच येणारे सोनेरी ऊन , क्वचित दिसणारे इंद्रधनुष्य, चुटुकदार तेरडा, नद्यांचे गढुळलेले पाणी, विविध फुलं, रंगच रंग. !



गीता गद्रे,
(टीमारनी म.प्र.)

अश्विनात रंग जरा पालटतात . शुद्ध पक्षातील चंद्राच्या वाढत्या कला आणि पौर्णिमेचा तो पूर्ण चंद्र, सोबतीला काळोखात ही उठून दिसणारी, महकणारी रातराणी ! दिवाळीच्या अंधाऱ्या रात्री पणत्यातील ज्योतींचा रंग ! काय किमया आहे ही.

वसंत ऋतुतील नवपालवीचा कोवळा रंग, वनात फुललेले पलाश, अमलताश, किती किती समृद्ध केले आहे या रंगांनी आपल्याला. लग्न सोहळ्यात तर या रंगांची मजा अधिकच न्यारी असते. नवरा नवरी च्या रंगांपासून, प्रत्येकाचे कपडे पोशाख, पदार्थांचे रंग, सजावटीचे रंग . रंगच रंग. !!

महिला वर्गात या रंगांना अधिक महत्त्व असतं . केसांचा रंग , चेहऱ्याचा रंग, साडी, शालू शेले, दागिने, किती अन् काय ! कुठल्या लग्नात, कोणी कुठला शालू नेसला, त्यांचे काठ कसे, पदर कसा ही चर्चा त्या महिलाच करू जाणे. ! पण रसिक हो ; हीच तर खरी आयुष्याची मजा ! या टेक्स्चर मध्ये तो रंग, त्या रंगात हे टेक्स्चर, तसे काठ या रंगात किंवा त्या काठाला हा रंग, हे सगळं शांतपणे ऐकून, दाखवणारा दुकानदार आणि बरोबर आलेला केविलवाणा नवरा यांच्या चेहऱ्यावरील रंग, त्या रंगांपेक्षा मला जास्त आवडतो .



तर मंडळी ही अशी रंगांची करामत. ! पण जे लोक या रंगापासून वंचित राहतात, केवळ स्पर्शाने त्याची अनुभूती घेतात, त्यांच्या जीवनात रंग भरण्याचे थोडेसे ही काम आपल्या हातून घडले तर हे रंगीत जीवन अधिक रंगतदार होईल. हेच जाता जाता. !!

# "जेलरची संघर्षगाथा" पुस्तकाचे प्रकाशन




**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – येथील निवृत्त कारागृह अधीक्षक के. जी. खेडकर यांच्या जेलरची संघर्षगाथा या आत्मकथनपर पुस्तकाचे प्रकाशन रविवारी १६ मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडले. ज्येष्ठ साहित्यिक उद्धव भयवाळ हे या प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

या वेळी व्यासपीठावर उद्धव भयवाळ यांच्यासह मध्यवर्ती कारागृह अधीक्षक दत्तात्रय गावडे, साप्ताहिक पोलखोल टाइम्सचे संपादक तथा ज्येष्ठ पत्रकार भगवानराव शहाणे, लोकमतचे ज्येष्ठ पत्रकार स. सो. खंडाळकर, ह. भ. प. विनायक महाराज अष्टेकर, पुस्तकाचे लेखक के. जी. खेडकर आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन आचार्य जयप्रकाश बागडे यांनी केले.

# कलावंतांना मोफत नाट्य प्रशिक्षणाची संधी

**ज्योतिर्मय साहित्य**

**जालना** – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे जालना येथे १० दिवसीय मोफत नाट्यप्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले असून २० मार्च रोजी सायंकाळी ६ वा. ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. डॉ. किशोर शिरसाट व सुंदर कुंवरपुरिया यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होणार आहे.

रंगभूमीचे जतन व संवर्धन करून नवे कलाकार घडवण्यासाठी सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि श्री. विकास खारगे, मा. अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सांस्कृतिक कार्य संचालक श्री. विभीषण चवरे यांच्या नियोजनात हे प्रशिक्षण शिबिर होणार आहे.

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात २० मार्च ते २९ मार्च २०२५ दरम्यान होणार्या शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्रातील ज्येष्ठ रंगकर्मी व तंत्रज्ञ लाभणार आहेत. प्रशिक्षण संपल्यानंतर महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र दिले जाईल तसेच शेवटच्या दिवशी सादरीकरणाची संधी विद्यार्थ्यांना मिळेल. शिबिराच्या यशस्वितेसाठी नाट्यांकुर नाट्यसंस्था सहकार्य करीत आहे.

या शिबिरासाठी मर्यादित जागा असून वय वर्षे १४ ते ४० या वयोगटातील नवोदित कलाकारांनी त्वरित नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी ८८८८१९१६२६ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन शिबिर संचालक, ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. तन्मय शेटगार यांनी केले आहे.

# श्रीयश फार्मसी महाविद्यालयात श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन



**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एजुकेशन रिसर्च मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सहा दिवसीय शिबीराचे गांधेली येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात स्वयंसेवकांनी विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

शिबिरादरम्यान वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, पाणी संवर्धन रॅली, मतदार जागृती सर्वेक्षण, तसेच डिजिटल साक्षरता सर्वेक्षण घेण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, आरोग्य व स्वच्छता मार्गदर्शन, गुड टच-बॅड टच जनजागृती, तसेच व्यसनमुक्ती व बालविवाहविरोधी पथनाट्य सादर करण्यात आले. याशिवाय नेत्रतपासणी शिबिर व आरोग्य जागरूकता कार्यक्रम राबविण्यात आले. शिबिराच्या शेवटच्या दिवशी जागतिक महिला दिन उत्सव व सास्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शिबिराच्या समारोप कार्यक्रमात असा समाज उपयोगी उपक्रम आयोजित केल्याबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि. बसवराज मंगरूळे, यांनी श्रीयश फार्मसीचे प्राचार्य तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




# उन्हाळ्यातील मंतरलेले दिवस...

बरचंस आयुष्य हे जरी मुंबईत गेले असलं तरी किमान दहावीपर्यंतची उन्हाळ्याची एक – दिड महिन्याची सुट्टी ही गावी कोकणातल्या घरातचं. सुट्टी लागली रे लागली की बोजा-बिस्तर बांधून आमची स्वारी गावी छु.

आजी- आजोबा अन चुलत आजी – आजोबा यांच्या पुण्याई मुळे एकत्र कुटुंब पद्धतिच्या आभाळमायेत गुरफटलेल आमचं घर. त्यामुळे उन्हाळयाच्या सुट्टीत घरातील माणसांचा आकड़ा किमान २५ चा तरी गाठायचा. मग लहान मुलांची वर्दळ असलेल्या आमच्या या घरात कुकड़ी कुक करत लपाछुपीचा डाव देखील खेळला जायचा. ही उन्हाळयाची सुट्टी म्हणजे आमच्या लहान मुलांची चंगळच. सकाळी उजाडलं की कोवळ्या उन्हात सात – साडेसात च्या दरम्यान या चिल्लरसेनेच्या पायदळलाच रानाच्या दिशेने वाटचाल. मग रानातली पायवाट तुडवत झाडीतली करवंद, आंबे, काजू, अळु, जमा करत, अनं मग रानातून परतल्यावर सर्व फलटण एकत्र न्याहरीसाठी अंगणात हजर. भाजी भाकरीत गुंडाळून अन भाकरीचे छोटे तुकडे सभोवती वावरत असलेल्या कोंबड्यांना इ इ करत चारत. पीटलभाकर, फोड़णीचा भात, चटनी-भाकर, कोलिम – सुकाट अशा विविधतेने नटलेल्या न्याहरीवर यथेच्छ ताव मारणे हा आमच्या चिल्लरसेनेचा दिनक्रम. अधीमधी कधी तरी हुक्की आली तर रानात देखील वनभोजनाचा कार्यक्रम व्हायचा.

दुपारचं सत्र कधी पत्यांचा मेंडिकोट अन पाच- तीन -दोनच्या डावने रंगायचा तर कधी कोणाच्या घराच्या जवळपास असलेल्या आंब्याच्या बिटकि खाली आंबे जमवण्यात. सर्व पोरं आपआपला पार्टनर अथवा टीम बनवून आंब्यासाठी दगडांचा कोठारा बनवायचे अन त्यात आंबे जमा करायचे. वाऱ्याची झुळुक आली की सर्व पोरं एकदम सतर्क व्हायाची अन एखादा आंबा पडला की घोड्याच्या वेगाने तो मिळविण्यासाठी झुंजायचे. आमच्यात एखादे औडान कारट असे भी असयाचं की मुद्दामहुन गुपचुप एखादा नासका किंवा कच्चा आंबा झाडातुन भिरकवायचा अन समदयांची दिशाभूल करायचा. मग जमवलेल्या आंब्याचा रस काढून आंबापोळी करण्यासाठी आमच्या ताई आणि आत्या अपार मेहनत घ्यायाच्या. ताटात काढलेला आमरस उन्हात सुकवण्यासाठी घराच्या कौलावर ठेवायाच्या अन कावळे चोच मारू नये म्हणून ताटांसमोर आरसा ठेवायच्या, तिन चार दिवस उलटले की, कावळे नाही पण आमच्या घरातले माझ्यासारखे डोमकावळे गुपचुप त्यातील काही आंबा पोळीचा फडशा पाडायचे.

उन्हाळयाचे दिवस असल्याने पाणी टंचाई ही नेहमी भासायची, मग सायंकाळी घरातील महिला मंडळ सोबत पुरुष वर्ग आणि खास करुन आम्ही चिल्लर पिल्लर
कदम कदम बढ़ाये जा,
ख़ुशी के गीत गाये जा
अशी परेड करत विहिरीच्या दिशेने आगेकूच करायचो. हातात असलेले रिकामे हंडा कळशी धमडक – तमडक वाजवत,
हांडा कळशी मी घेते
दादा मी लग्नाला येते
अशी भोकाड पसरवुन गाणी म्हणत विहीर गाठायचो. विहिरीवर दोन ते तीन खेपा टाकायचो. पण वातावरण इतक मजा मस्तीने भरलेल असायच की डोक्यावारील हांडा कळशीचा भार देखील हलका होवुन जायाचा. मग संध्याकाळी सातच्या सुमारास हरीनाम्याच्या बँकेत राम नाम जमा करण्यासाठी आमच्या पोरांची वाडीतल्या विठ्ठल मंदिरात आवर्जून हजेरी असायची. हरी मुखे म्हणा म्हणत हरीपाठ करुन २५ ते २८ जणांनी भरलेल्या आमच्या घरातील रात्रीच्या पंक्तित पोट भरल्याची समाधानाची ठेकर देत रात्रीचा पुढचा मुक्काम हा दारातील अंगणात असायचा. अंगण म्हणजे आमचा रात्रीचा बालेकिल्ला. आभाळाचं पांघरूण ओढलेल्या या अंगणात कधी टपोऱ्या चंद्राच्या हॅलोजनखाली तर कधी चमचमत्या ताऱ्यांच्या एल ए डी लाइटिंगमध्ये, तर कधी मनमोहुन टाकणाऱ्या झांडावरील चमकणाऱ्या काजव्यांच्या सहवासात घरच्या मंडळींच चर्चासत्र रंगायच अन जुन्या पुराण्या गोड आठवणींचा गुलाल उडायचा. आम्ही देखील त्या गुलालात न्हावुन जायचो. केंव्हातरी घरातली चिचुताई भूताच्या गोष्टी सांगायाला सुरवात करायची तेंव्हा मात्र माझी फुल्टू टरकायची. पर जेंव्हा आमचे आजोबा गोष्ट अन उखाणे (कोडी ) घालायला सुरवात करायचे तेंव्हा मात्र आम्ही बालगोपाळ त्यात तल्लीन होवुन जायचो. आजोबांची गोष्ट सांगायची एक विशिष्ट लगबग अन विनोदी शैली होती. आजोबांचे उखाणे म्हणजे अगदी हस्याचे कारंजेच. आरामखुर्चीत बसलेल्या आजोबांच्या घसरगुंडीवर मी तेल मालिश करत असताना आजोबा आम्हाला उखाणे घालायचे त्या पैकीच आठवणीत राहिलेले काही, ठिया ठिया पिकल्या फळाच्या बाहेर बिया – ( काजू ) .. इथ धपु तीथ धपु धपुला दहा पाय ( किरवि) धावा रे धावा पाच जण धावा खोपटीतून आले रामजीबुवा – ( सर्दी झालेल नाक ). दोन डोंगरांच्या मधी भिक्या ओरडतो? हा हा हा ओळखा पाहु कोण? असा या रंगलेला गप्पा गोष्टींचा फडात अन गुजगोष्टीत रात्रदेखील आमच्या सोबत निजुन जायची.



वैभव वाघे
७७३८२०१३६३
भाईदर

मे महिन्याच्या अखेरीस अथवा जून च्या सुरवातीस पेरणीच्या कामाला सुरवात व्हायची. मी देखील हौस म्हणुन काकांच्या हाताला हात धरून नांगर धरायचो. आयुष्यात विमान न चालवण्याच दुःख कधीच नसेल पर नांगर धरल्याच सुख सदैव पाठीशी असेल. शेतावर अर्ध लक्ष्य हे न्याहरी घेवुन येणाऱ्या माणसाकड़े लागलेल असायाच. पोटात भुकेच्या आगीचा डोंब उसळल्याने नजरा या त्यालाच शोधत असायच्या. शेतावर सगळ्या माणसात मिळून न्याहरी करण्याची पर्वणि ही आगळीच. आजही मी ताज होटलमधल्या पंच पक्वानां पेक्षा शेतावर बांधावर बसून खालेल्या मीठ भाकरीला पहिली पसंती देईन. तर असे होते हे माझे मौज, मजा – मस्ती, हौस, विरंगुळा, आनंदाची झालर असलेले, अन नात्यांच्या घट्ट आभाळ मायने मंतरलेले दिवस. यांना मी मंतरलेले दिवस इतक्या साठीच बोलतो की त्या दिवसांमधे अशी जादू होती की पुन्हा मुंबईला परतीच्या वेळी पाऊल अगदी जड होवून जायची. एकदा दोनदा असाही प्रसंग घडला आहे की मुंबईला परत जायच नाही म्हणुन मी माळयावर अन धान्याच्या कनगीत लपून बसायचो. इतके दिवस राहून गावचा लळा लागलेला मी अन माझा लळा लागलेले माझे आजी – आजोबा माझ्या मुंबईला परतीच्या वेळी अश्रुना वाट मोकळी करून आपल्या भावना व्यक्त करत. पुन्हा लवकर ये. गाड़ी घोड़यातुंन सांभाळून. मस्ती करू नकोस म्हणत डबडबलेल्या डोळ्यांनी निरोप देयाचे.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559